।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone: (02462) 229294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 229572 e-mail:directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. : परीक्षा/२०२०-२१/१०८ दिनांक: २९/०६/२०२०

परीपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, परभणी,
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
मा. प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ

विषय : पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२० प्रात्यक्षिक परीक्षा घेणे बाबत.
संदर्भ : ०१. परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र. परीक्षा/२०१९-२०/२० दि. १९/०५/२०२०
०२. परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र. परीक्षा/२०२०-२१/१०४ दि. २६/०६/२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, आज दिनांक २९/०६/२०२० रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतीला पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक, एस.ई.सी., प्रकल्प परीक्षा (लागु असेल तेथे) घ्यावयाच्या राहिल्या असल्यास सदर प्रात्यक्षिक,एस.ई.सी., प्रकल्प परीक्षा महाविद्यालय स्तरावर संदर्भीय पत्र क्र. ०१ मधील मुद्दा क्रमांक ०६ नुसार छोटया तुकडयात किंवा कमीतकमी वेळेत शासनाच्या निर्देशानुसार सामाजिक अंतर ठेवुन पूर्ण करुन जेथे शक्य असेल तेथे घेण्यात याव्यात, जर विद्यार्थ्यांना बोलाविणे शक्य नसेल तर या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने मौखिक परीक्षा/अंतर्गत व निरंतर मूल्यमापन गुण/ प्रकल्प अहवाल/ प्रात्यक्षिक रेकॉर्ड बुक/ गुगल फॉर्म द्वारे प्रात्यक्षिक, एस.ई.सी., प्रकल्प परीक्षेची प्रश्नावली देवुन गुणदान करण्यात यावे. या प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक ०१/०७/२०२० ते १५/०७/२०२० दरम्यान आयोजित करुन सर्व विद्यार्थ्यांचे गुण परीक्षा विभागामार्फत पुरविण्यात आलेल्या ऑनलाईन लिंकद्वारे व त्याची प्रिंट आऊट प्राचार्याच्या स्वाक्षरीसह परीक्षा विभागास पाठविण्यात यावी. प्रात्यक्षिक, एस.ई.सी., प्रकल्प परीक्षेसाठी अंतर्गत व बाह्य परीक्षक म्हणून त्याच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी परीक्षकाची जबाबदारी पार पाडावी.

वरील प्रमाणे घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परीक्षेचे सर्व रेकॉर्ड महाविद्यालय स्तरावर जतन करुन ठेवण्यात यावे. सदर रेकॉर्डबाबतपरीक्षा विभागाकडुन मागणी झाल्यास सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य असेल. वरील प्रमाणे प्रात्यक्षिक परीक्षेच्या कार्यपध्दतीची नोंद घेऊन प्रात्यक्षिक परीक्षा पुर्ण कराव्यात. हि बाब सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(डॉ. रवि एन. सरोदे)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**

१. मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तूत विद्यापीठ.
२. मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
४. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
७. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की सदर बातमी विनामुल्य वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.
८. उपकुलसचिव, सहा. कुलसचिव, अधिक्षक/सहा. अधिक्षक, संगंणक कक्ष परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ